C:\Users\acer\Favorites\Desktop\ATS Prospectus-24-6-2019\Advertise folder\Cover letter. advertisement-24-6-2019.doc

# निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
## कृषि तंत्र पदविका (दोन वर्षे-मराठी माध्यम) / कृषि तंत्रज्ञान पदविका (Agril. Polytechnic) (तीन वर्षे-अर्ध इंग्रजी माध्यम) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया २०१९-२०

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठस्तरावरुन **मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. पुणे ( 'केटीपीएल' KTPL) यांच्या** मार्फत केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता :**

| अ. क्र. | प्रवेशाचे वर्ष | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | पहिले | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १०वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| २ | पहिले | कृषि तंत्रज्ञान पदविका (Agril. Ploytechnic)(अर्ध इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | पहिल्या वर्षात सन २०१९-२० पासून कृषि परीषदेच्या ९६व्या बैठकीतील ठराव क्रमांक ०२/९६/२०१८ अन्वये प्रवेश देण्यात येणार नाही. |
| ३ | दुसरे | कृषि तंत्रज्ञान पदविका (Agril. Polytechnic) (अर्ध इंग्रजी माध्यम) | २ वर्षे | उच्च माध्यमिक शालांन्त परीक्षा शास्त्र शाखा (भौतिक शास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांसह) उत्तीर्ण |
| ४ | तिसरे | कृषि तंत्रज्ञान पदविका (Agril. Polytechnic) (अर्ध इंग्रजी माध्यम) | १ वर्षे | महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठातून २ वर्षे कालावधीचा कृषि तंत्र पदविका उत्तीर्ण |

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठस्तरावरून केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका प्रवेश अर्जासह **मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. पुणे ('केटीपीएल' KTPL) यांच्या http://vnmkvdiplomaadmission.in** संकेतस्थळावर **दिनांक २७/०६/२०१९** पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती :**

- उमेदवारांने **मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि.पुणे ('केटीपीएल' KTPL) यांच्या http://vnmkvdiplomaadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २७-६-२०१९ ते १३-७-२०१९** या कालावधीत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. या नंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध नसेल.
- ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना उमेदवाराने पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबधीत मुळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्ज भरते वेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बॅंकिंग द्वारे भरावे.
- प्रवेश अर्ज भरण्या पुर्वी प्रवेश माहिती पुस्तिका व सोबत दिलेली परिशिष्टे काळजीपुर्वक वाचावीत.
- प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क.
  खुल्या प्रवर्गासाठी रू.४०० व आरक्षीत प्रवर्गासाठी रू.२००/- (अ.जा., अ.ज., वि.जा.*, भ.ज. *, इ.मा.व.*, वि.मा.प्र.*, एसईबीसी*, इडब्ल्युएस*)
  {* उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य }

प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यक्रम इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळावर **दिनांक २७-६-२०१९** पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

क्र.एएक्सआय/२०१९/
दिनांक: 25/ 06 /2019

कुलसचिव
वनामकृवि, परभणी